# लासुरगाव, ता. वैजापुर येथे पशुवैद्यकिय रुग्णालयाचे भुमिपुजन संचन

## शिवसेना वर्धापन दिनानिमित्त देवी दाक्षायणी येथे महाआरती

**संभाजीनगर ( ता.०६ )** शिवसेना संभाजीनगर शाखेच्या वर्धापन दिनानिमित्त हिंदू जनजागरण सप्ताहा दरम्यान जिल्हात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये विकासकामे, वृक्षारोपण, मेळावे, अशा समाजपयोगी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.त्याचा एक भाग म्हणुन वैजापुर तालुक्यातील लासुरगाव येथे पशु वैद्यकिय रुग्णालयाचे भुमिपुजन शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. त्यानंतर जिल्ह्याचे ग्रामदैवत असलेल्या जागृत देवी दाक्षायणी येथे महाआरती दालन, हिंदू जनजागरण सप्ताह साजरी करण्यात आला.

यावप्रसंगी सहसंपर्कप्रमुख अण्णासाहेब माने, जिल्हाप्रमुख अंबादास दानवे, नरेंद्र त्रिवेदी, माजी आमदार आर. एम. वाणी, तालुकाप्रमुख रमेश बोरनारे, बाबासाहेब जगताप, जि. प. सदस्य मनाजी मिसाळ, ॲड. आसाराम रोठे, जिल्हासंघटक आनंदीबाई अन्नदाते, अविनाश गलांडे, कचरु डिके पाटील, सिंधूताई वाणी, अन्नपूर्णा जेजुरकर, नंदू जाधव, प्रकाश मतसागर, किशोर हुमे, हरिश्चंद्र, संतोष उदावंत, विष्णु शेजवळ, बंडू कुलकर्णी, अशोक सोनवणे, किशोर फिरके, संतोष मिसाळ, अनिल ढोकळ यांची प्रमुख उपस्थिती होती.

शिवसैनिकांनी १ ते ८ जुन दरम्यान आयोजित केलेल्या या सप्ताहामध्ये मोठ्या प्रमाणावर शिवसेनाप्रमुखांचे विचार घरोघरी पोहचवण्याचे आवाहन शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांनी मार्गदर्शन मेळाव्यात केले.

प्रसिध्दी प्रमुख

गणेश वाघ.

कार्यालय : ''खैरे निवास'', वसंत भवन समोर, मच्छली खडक, संभाजीनगर-४३१ ००१. दुरध्वनी : ( ०२४० ) २३३११२५, २३३१२२५. फॅक्स : ( ०२४० ) २३४३०२५

cbkhaire@gmail.com , yp4329@gmail.com , ydp4329@gmail.com , procbkhaire@gmail.com ganeshwagh4400@gmail.com

8421415255/9420404329 8484066606/9604384400